नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## खरातला ७ दिवसांची कोठडी

### SIT आता चौथ्या गुन्ह्यात घेणार ताबा; भोंदू खरात आज कोर्टापुढे हात जोडून उभा राहिला



**नाशिक : (स. गांवकरी)**

महिला लैंगिक शोषण व आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तुरुंगाची हवा खाणाऱ्या भोंदू अशोक खरातला आज कोर्टाने 7 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कोर्टाने त्याच्यावर दाखल तिसऱ्या गुन्ह्यात त्याला ही कोठडी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास करणारे विशेष तपास पथक आता त्याला चौथ्या गुन्ह्याप्रकरणी ताब्यात घेणार आहेत. सरकारी वकिलांनी या प्रकरणी त्याच्या पोलिस कोठडीची मागणी केली आहे.

अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण व आर्थिक फसवणूक केल्याचे आरोप आहेत. या प्रकरणी त्याच्यावर तब्बल 16 गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी 8 गुन्हे हे लैंगिक शोषणाचे आहेत. विशेष तपास पथक या सर्वच प्रकरणाचा कसून तपास करत आहे. आज त्याची पोलिस कोठडी संपत असल्यामुळे त्याला व्हिडिओ कॉन्फरंसिंगच्या माध्यमातून कोर्टापुढे हजर करण्यात आले. सुनावणीला सुरुवात होताच, न्यायाधीशांनी खरातला त्याचे नाव विचारले. त्यानंतर पोलिसांविरोधात मारहाणीची काही तक्रार आहे का? अशी विचारणाही केली. त्यावर खरातने हात जोडत नकार दर्शवला.

यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीनंतर कोर्टाने तिसऱ्या गुन्ह्यात अशोक खरातला 7 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर सरकारी पक्षाने तिसऱ्या गुन्ह्यातील पोलिस कोठडीचा हक्क अबाधित राखून खरातला चौथ्या गुन्ह्यात वर्ग करण्याची परवानगी मागितली. त्यावर कोर्टाने वैद्यकीय तपासणीनंतर त्याचा ताबा घेण्याची सूचना केली. त्यानुसार, आता वैद्यकीय तपासणीनंतर पुन्हा उद्या त्याला कोर्टात हजर करण्याची शक्यता आहे. त्यामुळे उद्याही त्याला आजच्यासारखेच ऑनलाईन पद्धीतने कोर्टापुढे हजर केले जाण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, ईडीने या प्रकरणी अशोक खरातच्या नाशिक येथे 5, पुण्यात 3 व शिर्डी परिसरातील 3 ठिकाणांवर छापेमारी केली आहे. नाशिकच्या तृप्ताबाला निवासस्थानीही ईडीने छापेमारी केली आहे. तिथे खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. शिर्डी परिसरातील समता पतसंस्थेच्या राहता येथील शाखेत ईडीचे अधिकारी पोहोचलेत. ते तिथे अशोक खरात नॉमिनी असलेल्या 100 खात्यांची चौकशी करत आहेत. या खात्यांमधून तब्बल 60 कोटींहून अधिक रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती आहे.

### प्रतिभा चाकणकरांची ८ तास चौकशी



नाशिकच्या गाजलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाचा तपास आता थेट राजकीय वर्तुळातील नातेसंबंधांपर्यंत पोहोचला असून, या प्रकरणातील चौकशीचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची सोमवारी शिर्डी पोलिस ठाण्यात तब्बल ८ तास चौकशी करण्यात आली. समता पतसंस्थेतील कोट्यवधींच्या संशयास्पद व्यवहाराप्रकरणी ही चौकशी करण्यात आली. या चौकशीदरम्यान प्रतिभा चाकणकर यांनी धक्कादायक खुलासा करत, पतसंस्थेतील ती खाती बनावट असून सर्व सह्या खोट्या असल्याचा दावा केला आहे. समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे एकूण चार खाती असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यात प्रतिभा यांच्या नावे दोन आणि त्यांचा मुलगा चिन्मय याच्या नावे दोन खाती आहेत. विशेष म्हणजे, या खात्यांमधून आतापर्यंत सुमारे २ कोटी ४० लाख रुपयांची मोठी उलाढाल झाली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या सर्व खात्यांवर वारसदार (नॉमिनी) म्हणून मुख्य आरोपी अशोक खरात याचे नाव नोंदवण्यात आले आहे. याच संशयास्पद व्यवहारांचा धागा पकडून पोलिसांनी चाकणकर माय-लेकांचा जबाब नोंदवला. चौकशीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रतिभा चाकणकर यांनी आपली बाजू स्पष्ट केली. त्या म्हणाल्या, "संबंधित खाती मी उघडलेली नाहीत, तसेच त्यावर असलेल्या माझ्या सह्या खोट्या आहेत. या खात्यांमधून आम्ही एक रुपयाचाही व्यवहार केलेला नाही. देवदर्शनाच्या बहाण्याने अशोक खरातने आमची कागदपत्रे घेतली होती आणि व्हॉट्सअॅपवर पाठवलेल्या त्याच कागदपत्रांचा गैरवापर करून ही बनावट खाती उघडली असावीत, असा दावा प्रतिभा चाकणकर यांनी केला. दरम्यान, आपल्याला कोणतीही अधिकृत नोटीस मिळाली नव्हती, तरीही बातम्या पाहून आपण स्वतःहून जबाब देण्यासाठी पोलिसांसमोर हजर झालो, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. प्रतिभा चाकणकर यांच्या वकील जयश्री काळे-पालवे यांनी या प्रकरणातील तांत्रिक त्रुटींवर बोट ठेवले. "प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलाच्या नावाने समता पतसंस्थेत बनावट खाती उघडण्यात आली आहेत. त्या कधीही या पतसंस्थेत गेल्या नाहीत. खाते उघडताना अर्जावर चुकीचा पत्ता वापरण्यात आला आहे.

## शॅम्पूच्या बाटलीत निघाले कॅप्सूल, किंमत तब्बल ४ कोटी २६ लाख

### नागपुरात DRI ची मोठी कारवाई



**नागपूर : (स. गांवकरी)**

अंमली पदार्थांची तस्करी करणारे आरोपी काय-काय शक्कल लढवून तस्करी करतील याचा कधीच अंदाज बांधता येणार नाही. तस्करांच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या पाहून तपास अधिकारी देखील चक्रावून जातात. पण तरीही अधिकारी या तस्करांचा शोध घेण्यात यशस्वी होतात. आतादेखील अशीच कारवाई समोर आली आहे. अंमली पदार्थ तस्करीसाठी गुन्हेगार कोणतेही कुटील मार्ग अवलंबू शकतात, याचा धक्कादायक नमुना नागपुरात समोर आला आहे. शॅम्पूच्या साध्या बाटल्यांमध्ये कोकेन लपवून राजधानी एक्सप्रेसमधून तस्करी केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) नागपूर युनिटने केलेल्या धडक कारवाईत तब्बल 4 कोटी 26 लाख रुपये किमतीचे 853 ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून एका महिलेला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी हजरत निजामुद्दीन केएसआर बेंगळुरू राजधानी एक्सप्रेसवर लक्ष ठेवले होते. संबंधित महिला दिल्लीहून बेंगळुरूकडे प्रवास करत असल्याची माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी नागपूर स्थानकावर सापळा रचला. गाडी स्थानकात आल्यानंतर संशयित महिलेवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. पुढे अजनी स्थानकावर गाडी थांबताच तिला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. तपासादरम्यान सुरुवातीला तिच्याकडे कोणतेही संशयास्पद साहित्य आढळले नाही. तिच्या सामानात कपडे, सौंदर्य प्रसाधने आणि सामान्य प्रवासी साहित्य होते. मात्र कपड्यांमध्ये ठेवलेल्या दोन शॅम्पूच्या बाटल्या अधिकाऱ्यांना संशयास्पद वाटल्या. त्यामुळे त्या बाटल्यांमधील द्रव काढल्यानंतर अधिकाऱ्यांना मोठा धक्का बसला.




टिप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठवण्यात आले असून न मिळाल्यास हीच निमंत्रण पत्रिका समजून उपस्थित राहावे ही विनंती

## थोडक्यात...

### समोरासमोर धडक

मुंबई (स. गांवकरी) : कल्याण - अहिल्यानगर महामार्गावर सोमवारी सकाळी ईको कार व सिमेंट मिक्सर ट्रकचा एक भयंकर अपघात झाला आहे. या घटनेत तब्बल 11 प्रवाशी ठार झाले असून, 2 जण गंभीर जखमी झालेत. मृतांत 3 महिलांचा समावेश आहे. या अपघातानंतर घटनास्थळी अंगावर काटा आणणारे दृश्य निर्माण झाले होते. यासंबंधीच्या माहितीनुसार, कल्याण - नगर मार्गावर सोमवारी सकाळी एक ईको कार व सिमेंट मिक्सर ट्रकचा भीषण अपघात झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यात ईको कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. त्यामुळे त्यातील 11 प्रवाशांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. ते जागीच ठार झाले. या घटनेत इतर 2 जणही गंभीर जखमी झालेत. त्यांना लगतच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. मृतांत 8 पुरुष व 3 महिलांचा समावेश आहे.





# थोडक्यात पण महत्वाचे



## बावधनमध्ये 'भीम फेस्टिवल 2026' उत्साहात संपन्न

पुणे (स. गांवकरी) : विकास प्रतिष्ठान व सुजाता महिला मंडळ, बावधन यांच्या वतीने सिद्धार्थ नगर, बावधन येथे 'भीम फेस्टिवल 2026'चे भव्य आणि दिमाखदार आयोजन करण्यात आले. रिपब्लिकन पक्षाचे युवक राज्य संघटक उमेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या निमित्ताने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक विशाल-साजन यांचा 'आंबेडकरी फोक' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाने उपस्थितांना प्रेरणादायी आणि सांस्कृतिक अनुभव दिला. कार्यक्रमादरम्यान पुणे महानगरपालिकेचे नवनिर्वाचित उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. हा सत्कार शिक्षणमहर्षी मा. राजेंद्र बांदल यांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच प्रभाग क्रमांक १० मधील विविध नगरसेवकांचाही नागरी सत्कार करण्यात आला. सन्मानित मान्यवरांमध्ये किरण दगडे पाटील, दिलीप (अण्णा) वेडे पाटील, निशा मानवतकर (स्थायी समिती सदस्य), अल्पना गणेश वरपे (महिला व बालकल्याण समिती अध्यक्षा) तसेच रुपाली पवार यांचा समावेश होता. यावेळी बावधन गावच्या माजी सरपंच वैशाली कांबळे, विशाल शेलार, स्वराज कांबळे, मुख्य आयोजक यशराज उमेश कांबळे, सदाभाऊ घुले, धनंजय दगडे पाटील, सूर्यकांत भूडे, दत्ताजी जाधव, रेखाताई सरोदे तसेच दिनकरजी चंदनशिवे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. या कार्यक्रमाला बावधन परिसरातील ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

## ऋग्वेद भोरला भाविकांनी दिला सर्वोत्तम "गाडीबगाड पट्टू किताब"

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील उदापुर गावची यात्रा विशेष म्हणजे फिरते "गाडी बगाड" खास याच गाडी बगाड फिरविण्याचा आणि ते फिरताना पाहण्याचा आनंद घेण्यासाठी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातुन अनेक भाविक भक्त उदापुरला हजेरी लावतात.गेली दोन वर्षे भाविकांनी गाडीबगाड फिरविण्याचा सर्वोत्तम 'किताब, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांचे चिरंजीव मास्टर ऋग्वेद भोर यास प्रदान केला. उदापुर ता:-जुन्नर येथील श्री काळ भैरवनाथ, मुक्तादेवीची जत्रा शुक्रवार दि:-१० एप्रिल रोजी सुरू झाली पहाटेअभिषेक मांडवढहाळे,शेरणी वाटप झाल्या नंतर दुपारी गाडी बगाड फिरविण्याचा कार्यक्रम सुरू झाला यात भाविकांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने गावाच्या परंपरे नुसारफिरविण्या साठी "जथा"पध्दतीने वेळ दिला प्रत्येक जथ्याला १० मिनिटे उपलब्ध करून दिली. यात प्रथम मान पाहुणे मंडळींना त्यानंतर अडाणी- कबाडी मंडळी,शिंदेवाडीकर, फुटजहागिरकर,चौधरी मंडळी, कुलवडे मंडळी,धाकटे शिंदे पाटील मंडळी,त्यानंतर थोरले शिंदे पाटील मंडळी गाडीबगाड फिरवितात यावेळी अनेक तरुण मंडळींनी हे गाडीबगाड फिरविण्याचे कसब व कला दाखविले उपस्थित भाविक, यात्रा कमिटी,ग्रामस्थ,पुणेकर व मुंबईकर मंडळी यांनी ते कसब व कला याचा आनंद घेतला यावेळी सर्व उपस्थित भाविकां नी ऋग्वेद भोर याला सर्वोत्तम गाडीबगाड फिरविण्याचा 'किताब प्रदान केला व सर्वांनी त्याचे कौतुक केले.

## दिगंबर नलगे यांना पीएचडी प्रदान



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील सांगवी दुमाला येथील प्रगतशील शेतकरी कुटुंबातील दिगंबर नलगे यांना दिनांक 11 एप्रिल 2026 रोजी पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. नलगे हे भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर येथील अर्थशास्त्र संशोधन केंद्राचे विद्यार्थी आहेत. दिगंबर नलगे यांनी "कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या शेतमालाच्या किमती व उत्पादन खर्चाचा तुलनात्मक अभ्यास" या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता. हा प्रबंध जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संभाजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सादर करण्यात आला होता.

# फुले व आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



जामखेड शहरातील मिलिंद नगर जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते रक्तदान शिबिर क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जामखेड शहरातील मिलिंद नगर जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिर काल शनिवार (दि. ११ एप्रिल २०२६) रोजी शहरातील मिलिंद नगर येथे उत्साहात पार पडले. या शिबिराची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. या रक्तदान शिबिरासाठी लाईफ लाईन ब्लड बँक तसेच युनिटी हॉस्पिटल यांच्या वतीने आरोग्य तपासणीचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिरास जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रांजल, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, नगरसेविका संगीता रामचंद्र भालेराव, नंदा प्रविण होळकर, प्रा. विकी घायतडक, युवा नेते प्रविण होळकर, संतोष गव्हाळे, बौद्धाचार्य अशोक आव्हाड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंकल घायतडक, उपाध्यक्ष उबेद शेख, सचिव ॲड. बाळासाहेब घोडेस्वार, खजिनदार सुमित भालेराव, सहसचिव विकी कांबळे, सुरज भालेराव, मंगेश घोडेस्वार,राम गायकवाड, अभिषेक सदाफुले, सोहेल अत्तार, अवि ओहोळ, सुशिल राजगुरू, संकेत घायतडक आदींसह सदस्य व मिलिंद नगर मित्र मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या उपक्रमात परिसरातील तसेच शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत रक्तदान केले. तसेच अनेकांनी आरोग्य तपासणी शिबिराचाही लाभ घेतला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'संयुक्त अभिवादन'

पुणे : (स. गांवकरी)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने मंगळवार, १४ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता भव्य 'संयुक्त अभिवादन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात राज्य व केंद्र सरकारमधील मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. या सोहळ्यास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, पार्थ पवार, मेधा कुलकर्णी यांच्यासह पुण्यातील सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत. तसेच पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा हे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विविध पक्षांचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे (काँग्रेस), धिरज घाटे (भाजप), सुनील टिंगरे (राष्ट्रवादी काँग्रेस), गजानन थरकुडे (शिवसेना उ.बा.ठा.), रवींद्र धंगेकर (शिवसेना) आणि श्रीकांत पाटील (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी) हेही उपस्थित राहणार आहेत.

## ग्राहकाला दिलासा : मार्वल लँडमार्कची याचिका फेटाळली

### महारेराचा परताव्याचा आदेश कायम; खरेदीदाराला १.३५ कोटी रुपये व्याजासह परत देण्याचे निर्देश

पुणे : (स. गांवकरी)




मुंबई उच्च न्यायालयाने घरखरेदीदारांच्या हिताला प्राधान्य देत मार्वल लँडमार्क कंपनीची याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे २०१९ मध्ये महारेरा प्राधिकरणाने दिलेला परताव्याचा आदेश कायम राहिला असून, कंपनीला फ्लॅट खरेदीदार सिद्धार्थ पळेशा यांना १ कोटी ३५ लाख ९९ हजार २४६ रुपये वार्षिक १०.२० टक्के व्याजासह परत करावे लागणार आहेत. या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरासन यांनी दिलेल्या निकालात ८ ऑक्टोबर २०२१ रोजीचा वसुली आदेशदेखील कायम ठेवला आहे. महारेरा प्राधिकरणाने दिलेल्या परताव्याच्या आदेशाला आव्हान देत मार्वल लँडमार्कने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

कंपनीच्या वतीने निर्णय देणाऱ्या निर्णयाधिकाऱ्यांना परतावा आदेश देण्याचा अधिकार नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला. मात्र, न्यायालयाने हा दावा स्पष्टपणे फेटाळून लावत, अधिकार योग्य पद्धतीने सोपविण्यात आले असतील तर निर्णयाधिकाऱ्यांना परताव्याचा आदेश देण्यास कोणतीही मनाई नसल्याचे नमूद केले.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात असेही स्पष्ट केले की, संबंधित आदेशाविरोधात कायद्यातील निर्धारित मुदतीत अपील दाखल करण्यात आले नव्हते. उलट ही याचिका जवळपास पाच वर्षांच्या विलंबाने दाखल करण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील कलम २२६ अंतर्गत असलेले विशेष अधिकार दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या प्रकरणांमध्ये सहजपणे वापरता येत नाहीत, असेही न्यायालयाने नमूद केले. याशिवाय, खरेदीदाराने आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतल्यानंतरच कंपनीने न्यायालयात धाव घेतल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. त्यामुळे कंपनीचा उद्देश केवळ अंमलबजावणीला विलंब लावण्याचा असल्याचा अप्रत्यक्ष संदेश या निर्णयातून व्यक्त झाला आहे. या निकालामुळे कायद्याने ठरवून दिलेल्या कालावधीत आव्हान न दिलेले आदेश अंतिम ठरतात आणि अनेक वर्षांनी ते पुन्हा उघडण्याचा प्रयत्न ग्राह्य धरला जाणार नाही, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. घरखरेदीदारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, महारेराच्या आदेशांना न्यायालयीन पाठबळ मिळाल्याचे यातून स्पष्ट झाले आहे.

## उदापुरला मतदार यादी पुर्ननिरीक्षण अभियानास उस्फुर्त प्रतिसाद

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्यात सोमवार दि:-१३ एप्रिल रोजी मतदार यादीचे सखोल पुर्ननिरीक्षण (एसआयआर-२०२६) अभियान सुरु झाले असून,त्यासाठी प्रशासनाने पूर्वतयारीला वेग दिला आहे.१९५ जुन्नर विधान सभा मतदारसंघाचे तहसीलदार बाळासाहेब शिरसट आणि मतदार नोंदणी अधिकारी पल्लवी घाटगे,मंडल अधिकारी डिंगोरे उदापुर यांनी नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

या अभियानातर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ सध्या प्रत्येक मतदाराच्या नावा ची २००२ च्या मतदार यादीशी जुळवणी करत आहेत.तसेच मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे,चुकीचे तपशील आर्दीची दुरुस्तीही केली जात आहे. नागरिकांनी आपले नाव २००२ च्या मतदार यादीत 'ईसीआयनेट' या अनुप्रयोगाचा वापर करून संबंधित मतदार संघ क्रमांक,मतदान केंद्र क्रमांक आणि अनुक्रमांकाची माहिती आपल्या बीएलओ यांना द्यावी.

ज्या मतदारांचे नाव २००२ च्या यादीत आढळत नाही त्यांनी आपल्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावांचा तपशील 'ईसीआयनेट' या अनुप्रयोगाद्वारे शोधून त्याची माहिती बीएलओ यांना देऊन जुळवणी प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि छायाचित्रे देखील बीएलओ यांच्याकडे सादर करावीत. सन २००२ नंतर नोंद झालेल्या मतदारांची 'वारस जुळवणी' (प्रोजिनी मॅपिंग) करण्यात येत असून,यामुळे मतदार यादी अधिक अचूक होऊन बनावट मतदारांची नावे वगळण्यास मदत होणार आहे.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी मंडल अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी:- सुभाष भालेराव, कोतवाल:-हेमलता शिंदे, ग्रामसेवक,मच्छिंद्र कवडे,कृषी सहायक,सरपंच:-सचिन आंबडेकर ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील:- अमित ठोसर, रेशन दुकानदार:- मोहन वल्व्हणकर,ग्रामपंचायत कर्मचारी गणेश शिंदे,सखाराम भले,तन्वी अमूप,कविता माळवे, दाजी डोके,तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधीनी बीएलओ :- दशरथ भाईक यांना उत्तम सहकार्य करीत आहेत यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी आपल्या कुटुंबातील सर्व मतदार कार्डचे पुनर्निरीक्षण करून घेतले आणि प्रत्येक मतदाराने स्वतःची जबाबदारी म्हणून या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन रविंद्र भोर यांनी केले आहे.

## महात्मा फुले यांचे विचार क्रांतीकारक – सचिन झगडे

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना अहिल्यानगर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, समाजाने धार्मिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. तसेच महापुरुषांचे विचार आचरणात आणून जीवनात प्रगती साधावी, असेही त्यांनी प्रतिपादन केले. महात्मा फुले जयंती आणि मुलगा शिवराज यांच्या वाढदिवसानिमित्त कुलदीप निंबाळकर व सुशिला निंबाळकर यांनी विद्यालयातील गरजू ४० विद्यार्थ्यांना सुमारे १५ हजार रुपये किमतीच्या शालेय बॅगचे वितरण केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी निंबाळकर कुटुंबीयांचे आभार मानले. तसेच श्री व सौ. निंबाळकर यांचा सन्मान पर्यवेक्षिका सुनीता काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलाशिक्षक शरद शिरसाट यांनी केले, सूत्रसंचालन सुधीर साबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य शहाजी एकाड यांनी केले.

# विशेष लेख : महिला सक्षमीकरणाचे नवे पर्व

**सुरेश पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर**

------ : (स. गांवकरी)



'बेटी बचाओ बेटी पढाओ' पासून सुरू झालेला हा प्रवास 'लखपती दीदी', 'महिला संशोधक' आणि 'महिला खासदार' या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. जेव्हा एखादी स्त्री आत्मनिर्भर होते, तेव्हा ती केवळ स्वतःचे कुटुंबच नाही, तर संपूर्ण समाजाचा आणि राष्ट्राचा विकास साधते. २०२६ हे वर्ष भारताच्या आत्मनिर्भरतेचे सुवर्णवर्ष ठरेल यात शंका नाही, कारण आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने समर्थ झाली आहे. आता गरज आहे ती या सुवर्णसंधींचा लाभ घेऊन प्रत्येक महिलेने आपल्या स्वप्नांना क्षितिज देण्याची !

**देशाच्या संसदेत १६ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत नारी शक्ती वंदन अधिनियम या ऐतिहासिक विधेयकावर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. याच अधिवेशनात हा अधिनियम मंजूर होण्याची शक्यता आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या पार्श्वभूमीवर, देशातील महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध धोरणे व योजनांचा सर्वंकष आढावा घेणारा हा लेख....**

२०२६ सालाकडे वळताना भारताच्या सामाजिक-आर्थिक पटलावर एक क्रांतिकारी स्थित्यंतर अधोरेखित होत आहे. 'महिलांचा विकास' या मर्यादित संकल्पनेकडून 'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास' या दिशेने झालेला भारताचा प्रवास हा केवळ धोरणात्मक बदल नसून तो राष्ट्रनिर्मितीचा नवा पाया आहे. २०१५ मध्ये सुरू झालेल्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या ऐतिहासिक अभियानाने गेल्या दशकात (२०१५-२०२५) लिंगभेदाच्या सामाजिक भिंती उध्वस्त करण्यात मैलाचा दगड गाठला आहे. 'विकसित भारत २०४७' च्या ध्येयप्राप्तीसाठी महिला आता केवळ योजनांच्या लाभार्थी उरल्या नसून, त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख इंजिन बनल्या आहेत. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने 'रणरागिणी' म्हणून जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दांत, "जेव्हाजेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असतो, तेव्हातेव्हा सारा देश मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकजुटीने कृती करतो." या भावनेतून 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (२०२३) द्वारे महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण सुनिश्चित करणारे ऐतिहासिक पाऊल उचलले गेले. २०२६ मध्ये कॅबिनेटने या अंमलबजावणीसाठी संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर केल्याने २०२९ च्या निवडणुकांपासून ही आरक्षण व्यवस्था प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. ही केवळ राजकीय प्रतिनिधित्वाची वाढ नाही, तर समता आणि सर्वसमावेशक लोकशाहीची नवी दिशा आहे.

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी सुरक्षित व भयमुक्त वातावरण ही पहिली पूर्वअट असते. जोपर्यंत महिलांना स्वतःच्या सुरक्षिततेची खात्री वाटत नाही, तोपर्यंत त्यांचे 'लखपती दीदी' होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. हे ओळखूनच केंद्र सरकारने 'मिशन शक्ती' अंतर्गत 'संबल' व 'सामर्थ्य' या दोन प्रमुख उपयोजनांना अधिक सामर्थ्य दिले आहे. 'संबल' अंतर्गत 'वन स्टॉप सेंटर' ही यंत्रणा आज हिंसाचारग्रस्त महिलांसाठी एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर, पोलीस आणि समुपदेशन सेवा पुरवते. महिला हेल्पलाइन (१८१) आणि राष्ट्रीय आपत्कालीन सेवा (११२) मुळे संकटकाळात तात्काळ मदत उपलब्ध होते. 'नारी अदालत' द्वारे स्थानिक पातळीवर किरकोळ वाद आणि हक्कांच्या उल्लंघनाचे निवारण करण्याचे अधिकार महिलांच्या हाती देण्यात आले आहे. 'निर्भया फंड' अंतर्गत इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम मजबूत करण्यात आले आहे. या धोरणात्मक प्रयत्नांचे फलित म्हणजे २०१४-१५ मध्ये ९१८ असलेले 'जन्मवेळचे लिंग गुणोत्तर' २०२४-२५ पर्यंत ९२९ वर पोहोचले आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण ९७.३ टक्क्यांपर्यंत वाढणे, ही केवळ आकडेवारी नसून महिलांच्या जीवनमानात झालेल्या गुणात्मक सुधारणेचा पुरावा आहे. 'जननी सुरक्षा योजना' द्वारे दारिद्र्य रेषेखालील महिलांना संस्थात्मक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य मिळते.

ग्रामीण भागातील महिला उद्योजकता ही आज भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा ठरत आहे. 'लखपती दीदी योजना २०२६' अंतर्गत देशातील ३ कोटी महिलांना वार्षिक किमान १ लाख रुपये उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट ग्रामीण अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. स्वयंसाहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांना कौशल्य प्रशिक्षण, ड्रोन चालवणे, हस्तकला आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात आहे. 'दीनदयाळ अंत्योदय योजना – (आजीविका)' द्वारे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करून महिलांना स्वरोजगाराची संधी मिळते. 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' हा मोठा आधार ठरला आहे. 'शिशु', 'किशोर' आणि 'तरुण' या तीन श्रेणींतर्गत १० लाख रुपयांपर्यंतचे विना-तारण भांडवल उपलब्ध करून दिल्याने लाखो महिला उद्योजिका बनल्या आहेत. 'स्टँड-अप इंडिया' योजनेद्वारे अनुसूचित जाती -जमाती आणि महिला उद्योजकांना १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळते. 'महिला शक्ती केंद्रे' आता परिपक्व पायाभूत सुविधा बनली असून, ग्रामीण महिलांमध्ये डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्य आणि 'महिला ई-हाट' द्वारे ऑनलाइन उत्पादन विक्रीची संधी उपलब्ध करून देतात. 'राष्ट्रीय महिला कोष' सूक्ष्म वित्तीय सहाय्य पुरवते.

केवळ उत्पन्न मिळवणे पुरेसे नसून, मिळवलेली संपत्ती सुरक्षित ठेवणे आणि मालमत्तेवर हक्क असणे हे खऱ्या सक्षमीकरणाचे लक्षण आहे. 'महिला सन्मान बचत प्रमाणपत्र' ही योजना ७.५ टक्के आकर्षक व्याजदरासह महिलांमध्ये गुंतवणुकीची शिस्त लावते (२ लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक). 'सुकन्या समृद्धी योजना' १० वर्षांखालील मुलींसाठी उच्च व्याजदर आणि करसवलतीसह दीर्घकालीन बचत सुनिश्चित करते. 'प्रधानमंत्री आवास योजना-शहरी' अंतर्गत घराची मालकी प्रौढ महिला सदस्याच्या नावे किंवा संयुक्त नावे असणे अनिवार्य केल्यामुळे 'मालमत्ता अधिकार क्रांती' झाली आहे. 'प्रधानमंत्री उज्ज्वला २.०' योजनेमुळे बीपीएल कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी कनेक्शन मिळाले, धुरापासून मुक्तता झाली आणि आरोग्य-वेळेची बचत झाली. 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' द्वारे गर्भवती व स्तनदा मातांना पहिल्या प्रसूतीसाठी ₹५,००० थेट बँक खात्यात मिळते; दुसऱ्या अपत्यावेळी मुलगी झाल्यास वाढीव लाभ आणि मजुरी नुकसानीची भरपाई दिली जाते.

शिक्षण हे सक्षमीकरणाचे अंतिम शस्त्र आहे. माध्यमिक स्तरावरील मुलींच्या नावनोंदणी दरात झालेली वाढ (७५.५% वरून ८०.२% पर्यंत) हे भारतातील सुशिक्षित पिढीचे आश्वासक चित्र अधोरेखित करते. 'एकात्मिक बालविकास सेवा' अंगणवाडीद्वारे ०-६ वर्षांच्या मुलींसाठी पोषण, आरोग्य आणि पूर्व-शिक्षण पुरवते. संशोधनाच्या क्षेत्रात महिलांना समान संधी मिळावी यासाठी 'सावित्रीबाई जोतिराव फुले फेलोशिप' ही योजना पथदर्शी ठरली आहे. एकुलत्या एक मुलीसाठी पीएचडी संशोधनासाठी जेआरएफ (₹३१,०००/-) आणि एसआरएफ (₹३५,०००/-) माध्यमातून भरीव आर्थिक मदत मिळते. सामान्य प्रवर्गातील महिलांसाठी ४० वर्षे आणि राखीव प्रवर्गासाठी ४५ वर्षे वयोमर्यादा शिथिल केली आहे. विज्ञानापासून सामाजिक शास्त्रांपर्यंत सर्व क्षेत्रांत महिला संशोधक देशाच्या बौद्धिक प्रगतीला नवी दिशा देत आहेत.

२०२३ मध्ये संमत झालेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम'ने कायदेमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची ऐतिहासिक संधी निर्माण केली. २०२६ मध्ये या विधेयकाची अंमलबजावणीसाठी कायदेमंडळांच्या पटलावर मंजूर होणार आहे. २०२९ च्या निवडणुकांपासून लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३% आरक्षण प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनानुसार, "महिलांसाठी जे पाऊल उचलले जात आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी सर्व पक्ष एकत्र यावेत." हा निर्णय केवळ राजकीय प्रतिनिधित्व वाढवणारा नाही, तर निर्णयप्रक्रियेत महिलांचा अनुभव आणि दृष्टिकोन जोडून प्रशासनाची गुणवत्ता वाढवणारा आहे.

२०२६ मधील महिला सक्षमीकरणाचे हे संपूर्ण चित्र सुरक्षितता (मिशन शक्ती), आर्थिक स्वावलंबन (लखपती दीदी, मुद्रा, स्टँड-अप इंडिया), मालमत्ता अधिकार (महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला) उच्च शिक्षण आणि राजकीय प्रतिनिधित्व (नारी शक्ती वंदन) या 'पंचसूत्री'वर आधारलेले आहे. सरकारी योजना आता केवळ कागदावर मर्यादित न राहता ते एक राष्ट्रव्यापी 'जनआंदोलन' झाले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



## अहिल्यानगरमध्ये गोहत्येला पूर्णविराम सोमनाथ घार्गे यांचा सन्मान

अहिल्यानगर (स.गांवकरी) : क्षेत्रफळाने विशाल असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गोवंशाचे रक्षण करण्यासाठी आणि गोहत्या पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने राबवलेली मोहीम कौतुकास्पद ठरत आहे.पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे यांच्या या धडाकेबाज कामगिरीची दखल घेत श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेद्रानंद सरस्वती जी महाराज (श्रीक्षेत्र ईंदू वासिनी गड,पिंपळनेर) यांनी आज पोलीस अधीक्षक कार्यालयात जाऊन त्यांचा विशेष सत्कार केला. सत्कार प्रसंगी बोलताना स्वामीजी भावूक झाले होते. त्यांनी पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले.स्वामीजी म्हणाले की, "राज्यात गोहत्या बंदी कायदा लागू झाला असला तरी, त्याची खऱ्या अर्थाने आणि कडक अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यात सोमनाथ घार्गे यांनी करून दाखवली आहे. आज आम्हाला बाहेर कुठेही गेल्यावर अभिमानाने अहिल्यानगरचे उदाहरण द्यावे लागते.अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची गरज आज छत्रपती संभाजीनगर सारख्या इतर शहरांनाही आहे." स्वामीजींनी यावेळी शास्त्रातील दाखले देत गोमातेचे महत्त्व विशद केले."आपल्या धर्मशास्त्रानुसार पाच मातांपैकी गोमाता ही एक मुख्य माता आहे. 'गावो विश्वस्य मातरम्' या उक्तीप्रमाणे गाईचे रक्षण करणे हेच सर्वश्रेष्ठ धर्मकार्य आहे. पोलीस प्रशासनाने हे पवित्र कार्य करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे," असे प्रतिपादन स्वामीजींनी केले.या गौरव सोहळ्यावेळी स्वामीजींसोबत वारकरी संप्रदायातील आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते:ह.भ.प. बाळकृष्ण महाराज ईलग,ह.भ.प. रामेश्वर महाराज आव्हाड,तुकाराम विघ्ने मल्हारी विघ्ने,यावेळी एलसीबीचे (LCB) पोलीस निरीक्षक किरण कुमार कबाडी यांच्या कार्याचाही गौरव करण्यात आला. पोलीस दलाने केलेल्या या कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यातील गो-प्रेमी आणि धार्मिक क्षेत्रातून आनंदाचे वातावरण व्यक्त होत आहे.



## सरुबाई पेसोडे पाटील अनंतात विलीन

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगडचे महंत राष्ट्रसंत श्री भास्करगिरीजी महाराजांच्या मातोश्री सरुवाई ज्ञानदेव पेसोटे पाटील यांचे ९९ व्या वर्षी वृध्दापकाळामुळे देवगड येथे रविवारी सकाळी ६-१५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले.त्यांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध संत महंत भाविक हजारोच्या संख्येने उपस्थीत होते. सरुबाई यांच्या निधनाचे वृत्त समजताच सकाळी-सुर्योदयापासुनच भाविकांची श्री क्षेत्र देवगड येथे अंत्यदर्शन घेण्यासाठी गर्दी झाली होती. संत महतांसह हजारो पुरुष, महीला युवक भाविकांनी अंत्यदर्शन घेतले. सायंकाळी साडेपाच च्या सुमारास मंदीर प्रांगणातून टाळ मृदुंगाच्या गजरात अंत्ययात्रेस प्रारंभ साला. या अंत्ययात्रेत विविध गावच्या भजनी मंडळासह,संत महंत,राजकीय क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते प्रवरामाईकाठी अन्नपूर्णा प्रसादालयाच्या प्रांगणात ब्रम्हवृदांच्या मंत्रघोषात महंत श्री भास्करगिरी महाराजांचे जेष्ठ बंधु मधुकर बाबा पेसोडे पाटील यांनी स्वर्गीय सरुबाईच्या शवाला अग्नी डाग दिला. यावेळी झालेल्या अंत्यसंस्कार समयी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष देवीदास महाराज म्हस्के, उद्धवजी महाराज मंडलिक,हभप सारंगधरजी महाराज,गोविंद महाराज जाटदेवळेकर, भागवताचार्य समाधान महाराज शर्मा,आळंदी येथील बाजीराव महाराज चंदेले नाना,कैलासगिरी महाराज,सौ. शालीनीताई विखे पाटील,विश्व हिंदू परिषदेचे आप्पा बारगजे,केशव महाराज उखळीकर,आळंदी येथील डॉ.नारायण महाराज जाधव,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली.

### जाहीर नोटीस

१) महादु सक्रु जाधव, रा. सांगवी,
ता. अकोले, जि. अहिल्यानगर ....**अर्जदार**

**विरुध्द.........** १) सहादु बापू जाधव, २) कैलास चिंधु भांगरे,
३) बाळु चिंधु भांगरे, ४) भागुबाई चिंधु भांगरे,
सर्व रा. सांगवी, ता. अकोले, जि.अहिल्यानगर ....**सामनेवाले**

या नोटीसीव्दारे कळविणेते येते की, महादु सक्रु जाधव, रा. सांगवी ता. अकोले, यांनी मौजे सांगवी, ता. अकोले येथील स.नं ९७ (जुना स.नं.९१/५) त्यानंतर वाडीविभाजन झालेनंतर स.नं.७० या ७/१२ वर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये ७/१२ वर नाव व नावासमोर क्षेत्र दाखल होणेबाबत दिनांक. ०१/१२/२०२५ रोजी अर्ज केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक. ०५/०५/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले यथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दिनांक १३/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**आरटीएस केस क्र.०२/२०२६**
**अकोले, दि .१३/०४/२०२६**

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५२/२०२६ — अकोले दि.१३/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. निलम बबन साबळे, रा. मोग्रस**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतः निलम बबन साबळे यांचा जन्म दि. ०५/०२/१९९५ रोजी आंभोळ** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **आंभोळ**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. निलम बबन साबळे, रा. मोग्रस**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतः निलम बबन साबळे यांचा जन्म दि. ०५/०२/१९९५ रोजी आंभोळ** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **आंभोळ**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १३/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क**

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# निळवंडे पाणी प्रश्न पुन्हा पेटले; आंदोलन सुरू!

अकोले : (स. गांवकरी)





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या पाणी प्रश्नावरून पुन्हा एकदा संघर्ष पेटला आहे. प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत शेतकरी व स्थानिक नागरिकांनी आज रात्रीपासूनच कॅनॉल मध्ये बसून शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन सुरू करण्यात आले आहे जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचे लक्ष जाणार की नाही असा संतप्त सवाल शेतकरी वर्गाने व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर आज सायंकाळी निळवंडेच्या उजव्या कालव्यात तंबू ठोकून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. पाण्याचे योग्य वाटप, कालव्यांमध्ये वेळेवर पाणी सोडणे तसेच शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी आता या भागातील शेतकरी संताप्त झाले आहे अभी नही तो कभी नही पाणी आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं आमच्या डोळ्यासमोरून पाणी वाहत असताना आम्ही शांत का बसावे धरणे बंधारे आमचे भागात लाभ मात्र खालच्या भागाला पाण्यावर आमचा देखील हक्क आहे त्यामुळे आमच्या मागण्या मान्य करा आम्हाला हक्काचे पाणी द्या यासाठी आता या ठिकाणी आंदोलन सुरू झाली आहे या आंदोलनाची दखल घेतली नाही तर हे आंदोलन कॅनॉल उद्ध्वस्त करतील या पलीकडे जाऊन खाली पाणी जाऊन देणार नाही या धरणाची चाक देखील वेळप्रसंगी आंदोलन बंद करतील.

यावेळी ज्येष्ठ नेते डॉ अजित नवले. शिवसेनेचे शिंदे गटाचे नेते बाळासाहेब भोर, अकोले कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भानूदास तिकांडे, अगस्ती पतसंस्थेचे उपाध्यक्ष गणेश पोखरकर.. अण्णा शेटे माजी उपसरपंच अशोक देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी या कॅनलमध्ये उपोषणास बसले असून या ठिकाणी भजन व गायन करत शेतकरी भर उन्हाळ्यात गर्मीमध्ये पाण्यासाठी टाहो फोडत आहे

आंदोलनादरम्यान "पाणी आमच्या हक्काचं आहे, कुणाच्या बापाचं नाही; आमचं पाणी आम्हाला मिळालंच पाहिजे," असा ठाम इशारा संघर्ष समितीने दिला. तसेच पालकमंत्र्यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणीही करण्यात आली. यापूर्वी शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला होता, मात्र अद्याप ठोस कारवाई न झाल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

धरण व बंधारे आमच्या तालुक्यात, शेती आमची; पण पाणी आमच्या डोळ्यासमोरून वाहून जाते आणि आम्हाला मिळत नाही. अजून किती बळी गेल्यावर आम्हाला न्याय मिळणार?" असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

## एरंडोली शाळेत राबवला पुण्याईची कहाणी उपक्रम

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एरंडोली येथे "प्राणी-पक्ष्यांना पाणी : पुण्याईची कहाणी" हा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. शाळेतील विद्यार्थी नवोदय तसेच शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये सातत्याने यश मिळवत असून, यावर्षी इयत्ता पाचवीच्या नवोदय परीक्षेचा निकाल ८७.५ टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच सहशालेय उपक्रमांनाही प्राधान्य देण्यात येते. त्याच अनुषंगाने शाळेतील शिक्षिका (प्राणिमित्र) सौ. पल्लवी आल्हाट यांनी विद्यार्थ्यांना पक्ष्यांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला. विद्यार्थ्यांनी घरातील जुनी मातीची भांडी शाळेत आणून त्यामध्ये दाणे व पाणी भरून शाळेच्या परिसरात ठेवली. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम अल्पावधीतच दिसून आला असून, एका आठवड्यात शाळेच्या परिसरात पक्ष्यांचा किलबिलाट वाढला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये दयाभाव, संवेदनशीलता आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव विकसित होत असल्याचे दिसून येते. तसेच टाकाऊ भांड्यांचा योग्य वापर करून पक्ष्यांची तहान भागवण्याचे समाधान विद्यार्थ्यांना मिळत आहे. उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सहकारी शिक्षक, मुख्याध्यापक कलगुंडे सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नवनाथ मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच एरंडोली गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ आणि पालक यांचे शाळेच्या विकासात मोलाचे योगदान आहे.

## खड्डेमय रस्ते आणि घाणीचे साम्राज्य; परिस्थिती गंभीर




हिंगोली : (स. गांवकरी)

वसमत शहरातील खंदारबन रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली असून, सर्वत्र खड्ड्यांचे जाळे पसरले आहे. या खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी, चिखल व घाण यामुळे संपूर्ण परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. परिणामी, या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती चिंतेचा विषय ठरत आहे. या भागात चार शाळा आणि एक महाविद्यालय असल्याने सकाळ-संध्याकाळ विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे, साचलेले पाणी आणि दुर्गंधीयुक्त घाण यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. अनेक वेळा वाहनचालकांना रस्ता ओळखणे कठीण होत असून, घसरून अपघात होण्याची देखील परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, शिक्षक व कर्मचारी वर्गालाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत असून, शैक्षणिक वातावरणावर त्याचा परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. साचलेल्या पाण्या व कचरामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असून, संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असूनही त्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे चित्र दिसत आहे. खड्डेमय रस्ते आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रश्नामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अशा मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होणे ही चिंतेची बाब मानली जात असून, खंदारबन रस्त्यांची सद्यस्थिती विद्यार्थी व नागरिकांसाठी मोठा त्रासदायक मुद्दा ठरत आहे.

शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात दुर्गंधीयुक्त वातावरणामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असून, शिक्षक व कर्मचारी वर्गालाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे स्वच्छता आणि रस्त्यांच्या स्थितीबाबत प्रशासनाकडे लक्ष वेधले जाणे आवश्यक असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

### लक्ष देण्याची गरज

खंदारबन रस्ता परिसरातील खड्डेमय रस्ते आणि साचलेल्या घाणीमुळे निर्माण झालेली दुर्गंधी ही गंभीर बाब ठरत आहे. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष, नगरपरिषद मुख्याधिकारी,तसेच बांधकाम विभाग यांनी या समस्येकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे चित्र आहे.

## १४ लाखांची फसवणूक करून आरोपीचे दुसरे लग्न

अकोले (अहिल्यानगर): (स. गांवकरी)




**हुंड्यासाठी लग्न मोडले; नवरदेव अटकेत!**

लग्नाचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना अकोले तालुक्यात उघडकीस आली असून, हुंडा न मिळाल्याने लग्न मोडून आरोपीने दुसरे लग्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अकोले पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सुनिता तान्हाजी चौधरी (रा. आंभोळ, ता. अकोले) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या मुलगी अपेक्षा हिच्या विवाहासाठी निखिल प्रकाश हासे (रा. बाणेर, पुणे) याचे स्थळ आले होते. दोन्ही कुटुंबांच्या संमतीने दि. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी कोतुळ येथील इंद्रप्रस्थ लॉन्स येथे सुपारीचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी सुमारे ३ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला होता.

त्यानंतर आरोपी निखिल हासे व त्याच्या कुटुंबीयांनी लग्नासाठी तब्बल १० लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी केल्याचा आरोप आहे. तक्रारदारांनी ही मागणी पूर्ण करण्यास असमर्थता दर्शवूनही, लग्न होणार असल्याच्या विश्वासाने विविध खर्च केले. यामध्ये आरोपीस २ तोळ्यांची सोन्याची चैन देण्यात आली तसेच सोन्याच्या अंगठीसाठी रक्कम देण्यात आली. लग्नासाठी कपड्यांवर सुमारे ६ लाख ७३ हजार १५१ रुपये खर्च करण्यात आले, तर संगमनेर येथील लॉन्ससाठी ५० हजार रुपये आगाऊ देण्यात आले. दरम्यान, दि. २४ मार्च २०२६ रोजी पुण्यात झालेल्या भेटीत आरोपीने हुंडा न दिल्यामुळे लग्न मोडत असल्याचे सांगितले. त्याचवेळी त्याने दुसऱ्या मुलीसोबत आधीच विवाह केल्याचे उघड झाले. या घटनेमुळे तक्रारदार कुटुंबाला तब्बल १४ लाख ३९ हजार ५५१ रुपयांचा आर्थिक फटका बसला असून मानसिक धक्काही सहन करावा लागला. या प्रकरणी निखिल हासे, त्याचे आई-वडील व इतर नातेवाईकांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(४), ३५१(२), ३(५) तसेच हुंडाबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोले पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद खंडबहाळे करत आहेत. विशेष म्हणजे, संबंधित मुलगी ही निवृत्त पोलीस अधिकाऱ्याची मुलगी असूनही अशा प्रकारे फसवणूक झाल्याने समाजात संताप व्यक्त होत आहे.

## सिद्धार्थनगर जि.प.शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा दिमाखात संपन्न

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा शहरातील सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण व आदर्श शाळा म्हणून ओळख निर्माण केलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिद्धार्थनगर येथे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा अप्रतिम आविष्कार पाहायला मिळाला.

इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत शिक्षण देणाऱ्या या शाळेत १७७ विद्यार्थी असून ८ शिक्षक त्यांना दर्जेदार शिक्षण देत आहेत. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सांस्कृतिक विकासालाही प्राधान्य देणारी ही शाळा परिसरात आदर्श ठरत आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन आशुतोष आदिनाथ पाचपुते (असोसिएट टाऊन प्लॅनर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ), अनिल शिंदे (सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी), निळकंठ बोरुडे व सुनिता वाजे (शिक्षण विस्ताराधिकारी), तसेच केंद्रप्रमुख उत्तरेश्वर मोहळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माणिक आढाव, संदीप भगत, चक्रधर पठारे, डॉ. संदीप मोटे पाटील, दिलीप काटे आदींसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, देशभक्तीपर गीते, नाटिका आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. पालकांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेत शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पालक, शिक्षक व शाळाप्रेमी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सौ. विमलबाई ईरले यांचे निधन


नेवासा : (समर्थ गांवकरी)



नेवासा येथील सौ.विमलबाई बजरंग ईरले यांचे अकस्मात निधन झाले मृत्यूसमयी त्यांचे वय ५७ वर्षे होते.त्यांच्या पच्यात पती,दोन मुले,सूना,नातवंडे असा परिवार आहे. नेवासा येथील प्रसिध्द मूर्तिकार बजरंग ईरले यांच्या त्या पत्नी तर सामाजिक कार्यकर्ते मूर्तिकार विलास ईरले व कैलास ईरले यांच्या त्या मातोश्री,तर कॉन्ट्रॅक्टर माजी नगरसेवक अंबादास ईरले यांच्या त्या चुलती होत्या. मनमिळाऊ स्वभावाच्या व धार्मिक वृत्तीच्या असलेल्या विमलबाई ईरले यांच्या अकस्मात निधनाने नेवासा शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नेवासा येथील अमरनाथ ग्रुपच्या वतीने सौ.विमलबाई ईरले यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.





































हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)